
न. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.





# महाराष्ट्र

## रूप-दर्शन



REFBK-0012188





भारताचे पंतप्रधान वृक्षारोपण करीत आहेत — जणूं महाराष्ट्र राज्याच्या जन्माचें हें प्रतीकच

REFBK-0012188

अनुक्रम २८२०४



## या पुस्तकासंबंधीं

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक वगैरे विविध अंगांची ओळख करून देणें हा या पुस्तकाचा हेतु आहे. महाराष्ट्राच्या जीवनाचें समग्र दर्शन घडविणें अेवढा महत्वाकांक्षी प्रयत्न येथें केलेला नाहीं. तसेंच राज्याच्या विभागांचें वेगवेगळें चित्रण करण्याचा दृष्टिकोनहि यांत नाहीं.

या मर्यादा जमेस धरूनहि पुस्तकांत दिलेल्या छायाचित्रांवरून महाराष्ट्राचें व्यक्तिमत्व पुरेसें प्रगट झालें आहे असा विश्वास वाटतो. नागरी व ग्रामीण अशा दोन्हीं भागांतील जीवनाचें दर्शन येथें घडेल. महाराष्ट्रांतील नद्या व पर्वतराजी यांचें चिरंतन सौंदर्य चित्रित करणारीं कित्येक दृश्यें येथें दिसतील. त्याचप्रमाणें डोंगरांच्या कडेकपारीवर बांधलेल्या अैतिहासिक किल्ल्यांचीं चित्रेंहि देण्यांत आलीं आहेत.

राज्यांतील आदिवासी लोक, वन-संपत्ति, पशुधन, खेडेगांवातून भरणाऱ्या जत्रा, लोकांचे सण-समारंभ यांबरोबरच राज्याच्या निरनिराळ्या भागांतील वीज व पाटबंधाऱ्याच्या योजनांचाहि अंतर्भाव करण्यात आला आहे.

महाराष्ट्रीय म्हणजे केवळ मराठी भाषिक लोकच असें नव्हें. महाराष्ट्र राज्यांत राहणारे निरनिराळ्या धर्मांचे व पंथाचे व निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक हे सर्व महाराष्ट्रीयच होत व महाराष्ट्राचें व्यक्तिमत्व या सर्वांनीं मिळून घडविलेलें आहे. निरनिराळ्या जमातीच्या लोकांचीं येथें जीं चित्रें दिलीं आहेत त्यावरून हें सहज दिसून येण्यासारखें आहे.

आतां चित्रेंच महाराष्ट्राची कथा सांगतील.

किंमत एक रुपया




सह्याद्रीचे कडे – महाराष्ट्राच्या कणखर देहाचें वैभव



सातपुड्यावर विराजणारा रमणीय चिखलदरा — महाराष्ट्रांतील एक मनोहर विश्रामधाम






प्रतापगडाच्या परिसरांतील लोक-
प्रिय आणि सुंदर महाबळेश्वर




निसर्गानें नटलेले माथेरान – देश व कोंकण यांच्या सीमेवरील
थंड हवेचें ठिकाण — मुंबईपासून अवघ्या ६७ मैलांवर



माथेरानवरून दिसणारें एक विहंगम दृश्य
उल्हास नदीचा सर्पाकृति प्रवाह व तिच्या कांठचा भूप्रदेश

माथेरानच्या माथ्यावरील हा मानव अंतरिक्षाचा शोध घेत आहे काय ?





— रायगडावरील गंगासागर तलाव




— आणि कर्जतला कवेंत घेणारी उल्हास नदी

गगनचुंबी वृक्ष व घनदाट अरण्यें ही महाराष्ट्राची वनसंपत्ति




पथिकांचा श्रमपरिहार करणारे विशाल वटवृक्ष





मुंबईच्या खाडीत विसावणाऱ्या ह्या नावा आतां मासेमारीसाठीं
दूर खोल समुद्रांत जाण्यास सज्ज होत आहेत



विदर्भातील मँगॅनीजची एक खाण



कोळशाचा शोध करीत जाणारा मार्ग



शेतींत घडलेली एक क्रांतिकारक गोष्ट – जुन्या लाकडी औताऐवजी आतां लोखंडी औताचा वापर सर्रास सुरुं झाला आहे



विदर्भांतील एक दृश्य. पाणवठ्या-जवळ गुरें विश्रांति घेत आहेत

पिकाची कापणी आटोपली म्हणजे खळ्यांत पेंढ्याच्या गंजी रचतात व नंतर बैलाच्या पायाखाली त्याची मळणी करून धान्य व भुसा वेगळा काढतात





डांगी जातीचा रुबाबदार बैल — जास्त पाऊस पडणाऱ्या प्रदेशांतील ही जात आहे



कोंकणातील मुख्य पिकें म्हणजें भात व नाचणी हीं होय. शेतांतून भाताच्या रोपांची लावणी चालू आहे




मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र
........... वि: ........... 
........... नों: दि: ...........

ज्वारीची भरलेली मोत्यांसारखी कणसे. ज्वारी व बाजरी हीं महाराष्ट्राचीं प्रमुख अन्नधान्यें

मका — दुय्यम प्रकारचें एक धान्य पीक





मांजरी येथें बियाण्यासाठीं तयार केलेलें कांद्याचे पीक. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रांतील कांदा पिकवणारा मोठा प्रदेश

कपाशी हें महाराष्ट्राचें महत्वाचें राशीचें पीक होय. मुख्यत्वें-करून विदर्भ व खानदेश येथें कापूस जास्त पिकतो





कोंकणच्या पश्चिम किनाऱ्यावरील पोफळीचीं व नारळीचीं झाडें




ऊंसाची छाटणी करण्यास कुशल हात लागतात. महाराष्ट्राच्या मध्य भागांतील जिल्ह्यांतून २६ साखरेच्या कारखान्यांचे जाळे पसरलेलें असून आणखीहि अनेक कारखानें निघत आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनांत ऊंसाचें फार मोठें स्थान आहे




केळ्यांचे घड



तृषार्तांची तहान भागविणारी शहाळी कोकणांत मुबलक होतात



नाशिकचीं प्रसिद्ध द्राक्षें




पपया — घराच्या परसामध्यें त्याचप्रमाणें शेतांतूनहि लागवड करतात



डॉलर कमविणारें दक्षिण कोंकणचे एक फळ—काजू



पुण्यालगतच्या प्रदेशांत पिकणाऱ्या अंजिरास फार मागणी असते





नागपुरी संत्री-आशियांत या तोडीचीं संत्री होत नाहींत. साहजिकच त्यांना मोठी मागणी असते



फळांचा राजा म्हणजे कोंकणचा हापूस व पायरी आंबा. आतां परदेशांतून पैसा आणीत आहे.

हळदीचीं पूर्ण वाढलेलीं रोपटीं. दक्षिण महाराष्ट्रांतील हें प्रमुख पीक आहे





अननस – राज्यांत कांहीं कांहीं ठिकाणीं काढला जातो



कलिंगड हे सामान्य माणसाचें फळ. राज्यांत बहुतेक भागांत नदीच्या पात्रांतून कलिंगडे पिकवतात. पिकाला मेहनत कमी लागते पण उत्पन्न मात्र भरपूर






उत्तर कोकणातील या तरुण स्त्रीने खास मराठी धर्तीचा पोशाख व दागिने घातले आहेत. नथ हा महाराष्ट्रीय महिलेचा एक अतिशय जुना अलंकार

दक्षिण महाराष्ट्रांतील शेतकरी हा असा असतो



मळणीची तयारी  पश्चिम महाराष्ट्रांतील शेतावरील एक परिचित दृश्य. धान्याची मळणी करण्याकरितां जोराचा वारा लागतो



पिकांची राखण करण्यासाठी विदर्भांत असें मचाण बांधतात




विदर्भांतील एका शेतावरील मळणीचें दृश्य



"न्याहारीचा वखुत" झालेला आहे आणि भाकर व कोरड्यास खायला "धनी" केव्हां येतात याची घरधनीण वाट पहात आहे

शेतांतून कापून आणलेल्या धान्याच्या पेंढ्या वाळविण्यासाठीं त्या व्यवस्थित रचून ठेवाव्या लागतात. वायका हें काम चांगलें करतात






"जत्रा" नाहींतर "उरुस" हें खेड्यांतील मोठें आकर्षण. आजूबाजूच्या खेड्यांतील शेतकरी बायकामुलांसह जत्रेस जातात. बायकोसाठीं लुगडं चोळी व मुलांना गोडी शेव या गोष्टी घेतल्याच पाहिजेत. "याड" लावणारा तमाशाचा फड झाल्याशिवाय जत्रेची मजा नाहीं



तांतडीच्या कामासाठीं विदर्भांत "छकडा" वापरतात



आणि नेहमींच्या प्रवासासाठीं ही एक साधी बैलगाडी - खाचर



महाराष्ट्रांतील लहान मोठ्या गांवां-तून हमखास दिसणारा घोड्यांचा टांगा



रस्त्यावरील दिवे लावणारा खेड्यां-
तील गांव कामगार



मध्य महाराष्ट्रांतील एक शेतकरी



शेतांत काम करणाऱ्या कुणबी स्त्रिया. कुणबी हे कोंकणांतील शेतकरी वर्गापैकीं होत



आणखी एक सुखी आणि आनंदी कुणबी स्त्री

सातारा जिल्ह्यांतील या शेतकऱ्याला कोंकरू म्हणजे आपलं मूलच



—आणि ही शेतकरी स्त्री आपल्या कोंकराला पाठुंगळीला घेऊन चालली आहे





मुंबईतील ही कोळीण जख्खड म्हातारी पण किती आनंदी




दोन छोटचा जीवांचें मोठें प्रेम



खेड्यांतील कारागीर वर्गांतील स्त्रियांच्या पोशाखाचा आणि वेणी-फणीचा एक प्रकार



मुगीच्या दिवसांत खेड्यांतील बैलगाडीवाल्यांची कोण धांदल उडते



उत्तर सातारा जिल्ह्यांतील एक मेंढपाळ आपल्या मेंढयांच्या कळपासह

विदर्भातील एक खेडूत "तुतारी" फुंकतो आहे. गांवांत मोठा पाहुणा आला म्हणजे नाहींतर सणासुदीला महाराष्ट्रांतील खेडयांत तुतारी नाहींतर शिंग वाजलेंच पाहिजे





गोकुळअष्टमीच्या दिवशीं "गोइंदा आला रे आला" कीं दहींहंड्या अशा फुटतात

श्री गजानन मूर्तीचें विसर्जन



गणेशचतुर्थी म्हणजे मोदक





वेदपठण – महाराष्ट्रीय ब्राह्मणांची संस्कृतपांडित्याबद्दल ख्याति आहे




“नागोबाला दूध”

सत्यनारायणाची महापूजा





मोहरमला नाचणारे वाघ "हिंदू"ही असतात



महाराष्ट्रांतील एक मुसलमान शेतकरी



लग्नसमारंभ




मोरपिसांचा टोप घालून भल्या पहाटेस गांवांतून हिंडत जाणारा वासुदेव



"गुबूगुबू" आवाजाबरोबर "मान हलविणारा" हा शोभिवंत "नंदी बैल" महाराष्ट्रांतील खेड्यां-पाड्यांतून हटकून दिसतो



मुंबईतील कोळी-स्त्रियांचे नृत्य



कोंकणांत होळीसमोर चालणारें पालखी नृत्य



माडिया आदिवासींचें हें जोडपें बाजाराला निघालें आहे



माडिया जातीचा युवक



[illegible] स्थळमत.

[illegible]

आणि गुटगुटीत मुलाला कडेवर
घेतलेली टवटवीत माची युवती





ठाणें जिल्ह्यांतील वारली स्त्रिया गवत कापण्याकरितां जंगलांत निघाल्या आहेत



मुंबईच्या आसपास आढळणाऱ्या माची जातीची मुलगी. वैशिष्टय-पूर्ण दागिने घातलेली



कोरकू आदिवासी जमातीचें कुटुंब



आणखी एक माची बालिका —आणि तिनें हातांत भरलेल्या खास तऱ्हेच्या बांगडया

फुलांनीं शृंगारलेलें शिरोभूषण आणि कवड्यांचा पोशाख घालून
नृत्यास निघालेला माडिया नर्तक






कळसा घेऊन नदीवर पाण्यासाठीं
निघालेली वंजारा युवती

शिंपल्याचे दागिने परिधान केलेल्या
गोंड आदिवासी मुली





माडिया महिलांचें नृत्य



पश्चिम महाराष्ट्रांतील आदि-वाशींचें नृत्य



माडियांचा ढोलकी नाच



ढोलकी व शिंग यांच्या तालावार
गोंड युवक नृत्य करीत असतांना



मुतार लाकडावर रंधा मारीत आहेत



— आणि लांकडाचें ओंडके कापतांना



एक बुरूड पट्टया विणून टोपली
तयार करीत आहे



—आणि आतां टोपलीस रंगाचा
शेवटचा हात देण्यात येत आहे










बाजारांत पाठविण्यासाठीं कुंभारानें
गाडगीं-मडकीं तयार ठेवलीं आहेत

खेडेगांवांतील लोहार तापलेल्या
लोखंडावर घण घालीत आहे





पुण्याच्या आसमंतांतील सिंहगडाचें एक भव्य दृश्य



—येथील हुतात्मा तानाजीची समाधि

जंजिरा किल्ला





प्रतापगड येथील भवानी देवीची मूर्ति. भवानी देवी म्हणजे शिवाजी महाराजांचें कुलदैवत


छत्रपति शिवाजी महाराजांच्या महत्त्वाच्या किल्ल्यांपैकीं एक —प्रतापगड



प्रतापगडावर बसविलेला
श्री शिवाजी महाराजांचा अश्वारूढ
पुतळा








श्री शिवाजी महाराजांना जेथें राज्याभिषेक झाला तो रायगड. रायगड महाराष्ट्राची राजधानीहि होती

श्री शिवाजी महाराजांचें जन्म-स्थान — शिवनेरी किल्ला. याच ठिकाणीं जिजावाईनें शिवबांचें पालनपोषण केलें.



शिवनेरी किल्ल्याच्या सात दर-वाज्यांपैकी अजूनही चांगल्या स्थितीत असलेला एक दरवाजा





निजामशाही राजांची एकेकाळी राजधानी असलेला अहमदनगरचा किल्ला—याच किल्ल्यांत १९४२ साली पंडित जवाहरलाल नेहरू व इतर राष्ट्रनेत्यांना कारावासांत ठेवण्यांत आले होते

अमरावतीजवळील गाविलगड






विदर्भांतील रामटेक टेकडीवरील देऊळ

रामटेक येथील अंबाला तलाव व त्याच्या कांठावरील जुनीं देवालयें



त्र्यंबकेश्वर येथील शिवमंदिर —
बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक



कोल्हापूर येथील अंबाबाईच्या
देवळांतील देवीची मूर्ति



मराठवाड्यांतील परळी वैजनाथाचें
देवालय. बारा ज्योतिर्लिंगापैकीं
हें आणखी एक ज्योतिर्लिंग






चंद्रभागेच्या तीरावर




इंद्रायणी नदी व तिच्या कांठीं अमलेली आळंदी



वर्धेच्या कांठावर पवनार येथें उभारण्यांत आलेली महात्मा गांधींची छत्री. वर्ध्यापासून अगदीं जवळच आहे

वांई येथील कृष्णाकांठावरील घाट



शिवनेरीवरील शिवाई देवी. शिवाई नवसाला पावली म्हणून छत्रपतींना शिवाजी हें अभिधान मिळालें



अमरावतीच्या अंबाबाईच्या देवळांतील अंबेची मूर्ति





विदर्भांतील रामटेक टेकडीवरील देऊळ

रामटेक येथील अंबाला तलाव व त्याच्या कांठावरील जुनीं देवालयें






त्र्यंबकेश्वर येथील शिवमंदिर—
बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक




कोल्हापूर येथील अंबाबाईच्या
देवळांतील देवीची मूर्ति



मराठवाड्यांतील परळी वैजनाथाचें
देवालय. बारा ज्योतिर्लिंगापैकी
हें आणखी एक ज्योतिर्लिंग



आळंदी येथील संत ज्ञानेश्वर मंदिर



—आणि त्यांची समाधि

ज्ञानेश्वरांचे समकालिन दुसरे एक संतकवि मुकुंदराज यांची समाधि




आणि येथें—देहू या आपल्या जन्मगांवीं—तुकाराम महाराजांनीं समाधि घेतली







पुण्याची पेशवेकालीन पर्वती




अमरावती येथील अंबामातेचें देवालय

औरंगाबाद येथील पाणचक्की म्हणजे पाण्याचा उपसा करणारी एक प्राचीन अद्‌भूत योजना






नांदेड येथील गोदावरीच्या तीरावरील शीखांचें गुरूद्वार



दौलताबाद येथील चांदमीनार





मुंबईनजिकची काण्हेरीचीं बुद्ध लेणीं



लोणावळचाजवळील भाजा येथील बुद्ध लेणीं

जगप्रसिद्ध अजिठा लेण्यांतील एक चित्र



आग्र्याच्या ताजमहालची प्रति-कृति म्हणजे औरंगाबाद येथील बिबिका-मकबरा. दख्खनचा ताज म्हणून त्याची ख्याति आहे



कैलास – जगांतील सर्वांत प्रचंड अशीं कोरीव लेणीं

२८४ १५०३५

घारापुरी येथील त्रिमूर्ति





अजंठा येथील एका लेण्यामधील तक्तपोशीवरील रंगीत चित्राकृति

कार्ला लेण्यामधील कोरीव काम






वेरुळच्या लेण्यामधील वृक्षाखालील
शिवमूर्ति



पेशवेकालीन वास्तुकलेचा नमुना
—पुणें येथील विश्रामबाग वाडा


रत्नागिरी येथील या घरांत
लोकमान्य टिळकांचा जन्म झाला





वर्ध्याजवळील सेवाग्राममधील या झोपडींत महात्मा गांधी राहत असत

त्यांची रहाणी जशी साधी होती तशाच त्यांच्या वस्तु. सेवाग्राम-मधील त्यांच्या झोपडींत त्या सुरक्षित ठेवल्या आहेत






मुबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनची इमारत



मुंबईच्या गोदीमधील एक माल-वाहू बोट



मुंबईची गोदी

नागपूर येथील पोलिटेक्निक इन्स्टिट्यूट. राज्यांतील शिक्षण व्यवस्थेंत तांत्रिक शिक्षणाला महत्त्वाचें स्थान आहे





मुंबईमधील एका शाळेंतील शिशु-वर्ग

मुंबईच्या हाफ्किन इन्स्टिटयूट-मध्यें सापाचे विष काढून त्यापासून सर्पदंशावरील औषध तयार करण्यांत येतें






राज्यांत मलेरियाचा प्रतिबंध करण्यासाठीं डी.डी.टी.चे फवारे मारण्यांत येतात

कैद्यांना चांगली वागवणूक देऊन त्याना औद्योगिक शिक्षण देणें हें सरकारचें धोरण आहे. तुरुंगांत कैदी गालिचा विणत आहे. या गालिचांना मोठी मागणी असते



खडकवासल्याच्या धरणाचें पाणी शेतीला पुरविण्यांत येते. पुणें शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा याच धरणापासून होतो




पुण्यानजीकचें भाटगर धरण






घोड धरणाचें बांधकाम नुकतेंच पूर्ण झालें असून या धरणामुळें पुणें व अहमदनगर या जिल्ह्यां-तील बऱ्याच मोठ्या जमिनीला पाणी मिळणार आहे

जगांतील सर्वांत मोठें मातीचें धरण म्हणजे नाशिकजवळील गंगापूर धरण





कुलाबा जिल्हयामध्यें धरमतर खाडीवर बांधलेल्या पुलामुळें जिल्हयाचें ठाणें अलिबाग जिल्ह्याच्या इतर भागांशीं जोडलें गेलें आहे



नागपूरजवळील खापरखेडा पॉवर स्टेशन





मुंबई-पुणें रस्त्यावर लागणारा खंडाळा घाट. मुंबई-पुणें रस्ता राज्यांतील अनेक सिमेंट कॉंक्रीट रस्त्यापैकीं एक महत्त्वाचा रस्ता आहे




वैद्यकीय मदत ही दूरदूरच्या खेडयांना फिरत्या मोटारगाडयांच्या द्वारें पोहचविण्यांत येते

स्टेट ट्रॅन्सपोर्टमुळें प्रवासाचीं उत्तम सोय झाली आहे







कोयना योजना ही महाराष्ट्राचा कायाकल्प करणार आहे. कोयना धरणाच्या भितीचें काम चालूं असतांना



कोयना—बांधकामाच्या जागीं असलेला ट्रॉलीचा मार्ग



अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यां-तील शेतकरी संघटनांनीं हजारों एकर जमिनीची बांधबंदिस्ती केली. इतर जिल्ह्यांतहि या कामाचें अनुकरण होत आहे




सहकारी साखर कारखान्यामध्यें ऊस उतरविण्याचें काम चालू आहे




मुंबईच्या सभोंवतीं अनेक मिठागरें आहेत. मीठ तयार करणें हा एक वाढता उद्योगधंदा आहे

कापड धंदा हा राज्यांतील प्रमुख उद्योगधंदा आहे. मुंबईतील कापड गिरणीच्या आंतील भागाचें दृश्य




कापड गिरणीत चातीवर काम करीत असलेला कामगार






विदर्भांतील बल्लारशहा येथील कागदाची गिरणी


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 21208 दि:
क्रमांक 218 नों. दि:


विदर्भातील कोळशाची खाण



मुंबई येथील आरे गौळीवाडा—
मध्यवर्ती डेअरीची इमारत

आरें येथील बाटल्यांत दूध
भरण्याचे यंत्र









दूध भरलेल्या बाटल्या शहरांत निरनिराळया ठिकाणीं पोहोंच-विण्यासाठी तयार ठेवण्यांत येत आहेत

राजाबाई टॉवर ही मुंबईतील सर्वात ऊंच इमारत आहे. ही इमारत मुंबई विद्यापीठाच्या इमारतीचा एक भाग आहे





कमला नेहरू पार्कमधील बुटाच्या आकाराची छोटी इमारत—मुलांची अतिशय करमणूक करते




मुंबई शहरास "भारताचें द्वार" असें अगदी यथार्थतेनें संबोधण्यांत आलें आहे



मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय

मुंबईतील मध्य रेल्वेच्या व्हिक्टोरिया टर्मिनस स्टेशनच्या समोरचा चौक






मुंबईतील मरिन ड्राइव्हला "राणीच्या गळयांतला हार" म्हणून संबोधण्यांत येते

चौपाटी - मुंबईतील हवा आणि भेळ खाण्याचें एक लोकप्रिय ठिकाण





वांद्रा येथील जुम्मा मशिद



मुसलमान बंधू नमाज पढतांना



पारशी समाज हा कर्तबगारी आणि धडाडीबद्दल प्रसिध्द आहे. वृध्द पारशी पुरोहित प्रार्थना करीत असतांना




मुंबईतील आर्चबिशपच्या अभिषेक सभारंभासाठीं जमलेला ख्रिश्चन लोकांचा मेळावा



मुंबई हे भारतांतील प्रमुख शहर असून येथें देशोदेशींचे व भारताच्या सर्व भागांतील लोक राहतात





संत्र्यांसाठीं प्रसिद्ध असलेलें नागपूर हें एक प्राचीन आणि ऐतिहासिक शहर आहे. नागपूर येथील शुक्रवार तलाव



नागपूर येथील तेलंगखेडी



हायकोर्टाची इमारत



तमाशा हें महाराष्ट्रांतील अत्यंत लोकप्रिय लोकनाटच आहे. शृंगारिक लावण्या व सोंगाड्या-चा विनोद हीं मराठी तमाशाची वैशिष्टयें


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र
अनुक्रम ................ विः ........
क्रमांक ...................... नोंः दिः ..........



डफ व तुणतुणें यांच्या साथीवर शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्द शाहीर गाऊं लागला कीं मराठी मन तल्लीन होऊन जातें




कुस्ती, मलखांब, हुतूतू, खोखो आणि आट्यापाट्या हे महाराष्ट्रांतील अतिशय लोकप्रिय खेळ होत. कुस्ती



मलखांबावरील कसरत

हुतूतूचा सामना





मराठी रंगभूमीची परंपरा प्रदीर्घ आहे. "भाऊबंदकी" या नाटकांतला एक प्रसंग. या लोकप्रिय नाटकाला राष्ट्रीय स्पर्धेत राष्ट्रपतींचें सर्वोच्च पदक मिळालें होतें.



"दुसरा पेशवा" या नाटकांतील एक प्रसंग



"होनाजी बाळा" मधील एक प्रसंग



भारतीय चित्रपट व्यवसायाची सुरुवात महाराष्ट्रांत झाली. कै. दादासाहेब फाळके हे चित्रपट सृष्टीचे जनक होत. वास्तववादी चित्रण करण्याबद्दल मराठी चित्रपटांची ख्याति आहे. राष्ट्रपतींचें पहिलें पदक मिळालेल्या "श्यामची आई" या चित्रपटातील एक दृश्य




"पेडगांवचे शहाणे" या चित्रपटांतील एक दृश्य.



"वहिनीच्या बांगडया" या चित्रपटांतील एक दृश्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 22208 दि:
क्रमांक 268 नों: दि:



REFBK-0012188

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 92966

ही महाराष्ट्रीय "सुद
पंतप्रधानांना हार घालीत


Prepared by the Director of Publicity, Government of Maharashtra, Bombay
Printed by S. Ramu at The Commercial Printing Press Private Limited
34/38, Bank Street, Fort, Bombay.














अजंठा येथील एका लेण्यामधील तक्तपोशीवरील रंगीत चित्राकृति